| CNR-MHAK080002192026 | फौ. कि. अर्ज क्र ०८/२०२६<br>रविंद्र पांडे ..वि.. सरकार |
|---|---|

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरी सुरक्षा संहितेचे कलम ५०३ अंतर्गत गुन्हा क्र.६०/२०२५ भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८(४), ११२ व ३(५) व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ मध्ये जप्त केलेले लोखंडी पलंग ६ नग, गोल डायनिंग टेबल ३ नग, खुर्ची २ नग, वापरती गादी २५ नग तसेच मोबाईल सॅमसंग आयएमइआय नंबर - 353412111663959/3952 (येथुन पुढे थोडक्यात ''मुद्देमाल'') सुपुर्तनाम्यावर सोडण्याकरिता दाखल केलेला आहे.

**२)** सदर अर्जावर तपास अधिकारी व विद्वान सरकारी वकिल यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. विद्वान सरकारी वकिल व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तीवाद ऐकला.

**३)** दस्तऐवजांच्या अवलोकनावरून स्पष्ट होते की, तपास अधिका-यांनी उपरोक्त नमुद गुन्हयात सदर मुद्देमाल अर्जदाराकडुन जप्त केलेला आहे. जप्त केलेले मुद्देमाल वरील मालकी हक्क दर्शविण्याकरिता उपरोक्त काही मुद्देमालाचे खरेदी बिल, प्रथम खबर अहवालाची प्रत आणि आधारकार्डची पडताळीत प्रत अर्जदाराने दाखल केली आहे.

**४)** सदर दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, अर्जदार यांनी **नि.क्र.८** वर आधारकार्डची पडताळीत प्रत दाखल केलेली आहे, अर्जदार यांनी **नि.क्र.९** वर लोखंडी पलंगाचे ६ नग खरेदी बिलाची पडताळीत प्रत, **नि.क्र.१०** वर गोल राउंड टेबल ३ नग व खुर्चीचे २ नग खरेदी बिलाची

पडताळीत प्रत, **नि.क्र.११** वर सिंगल बेड गादीचे २५ नग बिलाची पडताळीत प्रत दाखल केलेली आहे. त्यावरून त्यांची प्रथमदर्शनी मालकी सिध्द होते व ते एकमेव मालक असून त्यांना जप्त मुद्देमालाचा ताबा मिळविण्याचा अधिकार आहे. जप्त मुद्देमालावर अर्जदार यांचे शिवाय इतर कुणीही मालकी हक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार दर्शविलेला नाही.

**५)** **नि.क्र.१२** वर सॅमसंग कंपनीच्या मोबाईलच्या बिलाची पडताळीत प्रत दाखल केलेली आहे. परंतू सदर बिलावरील मोबाईलचा आयएमईआय नंबर अर्जामध्ये नमूद आयएमईआय नंबर सोबत तसेच **नि.क्र.१४** मध्ये तपास अधिकारी यांनी दाखल केलेल्या म्हणण्यामधील आयएमईआय नंबर सोबत जुळुन येत नाही. त्यामुळे अर्जदाराची सॅमसंग कंपनीच्या मोबाईलवर प्रथदर्शनी मालकी सिध्द होत नाही.

**६)** सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात राज्य शासन, २००२ *Supp(3) SCR 39,* या न्यायनिर्णयामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे निष्कर्षित केले आहे की, मुद्देमाल पोलिस स्टेशनमध्ये मोकळया व उघडया जागेवर ठेवलेले असल्यामुळे सदर मुद्देमाल वा–यात, पावसात व उन्हात उभे असल्यामुळे सदर मुद्देमालाचे स्पेअर पार्टस् गंजून खराब होवून निकामी होतील. सदर मुद्देमाल दैनंदिन देखभालीच्या अभावी अनिश्चित कालावधीसाठी पोलीस स्टेशनमध्ये निरूपयोगी पडून राहिल्यास निश्चितच ते खराब होउन त्याची किंमत व उपयोगिता कमी होईल. त्यामुळे न्यायालयाने सदर जप्त मुद्देमालास योग्य त्या अटी व शर्तीस अर्जदारास परत करावे असे वाटते.

**७)** वरील न्यायनिर्णयामध्ये न्यायतत्वाचा विचार करता तसेच जप्त मुद्देमाल सुपुर्तनाम्यावर योग्य अटी लादुन अर्जदाराच्या ताब्यामध्ये देणे न्यायोचित ठरेल तसे न केल्यास अर्जदाराचे नुकसान होईल. उपरोक्त नमुद मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये दिर्घ कालावधीपर्यंत निरूपयोगी ठेवल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. वरील सर्व चर्चेअंती मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. सदर अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत गुन्हा क्र. ६०/२०२५ भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८(४), ११२ व ३(५) व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ मध्ये जप्त केलेले लोखंडी पलंग ६ नग, ३ गोल डायनिंग टेबल, खुर्ची २ नग, वापरती गादी २५ नग वर अर्जदार त्यांचा मालकी हक्क सिध्द करीत आहे. त्यामुळे अर्जदार रविंद्र विष्णूपंत पांडे यांनी किंमत ८०,०००/- रुपयांचा सुपुर्तनामा बॉड लिहुन दिल्यानंतर त्यांना खालील अटी-शर्तींचे अधिन राहुन सदर जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा देण्यात यावा.

३. अर्जदाराने उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाचे स्वरूप, रंग, इत्यादीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये की, ज्यामुळे त्याची ओळख होणे शक्य होणार नाही.

४. अर्जदाराने उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाची विक्री किंवा गहाण ठेवु नये व कोणत्याही प्रकारचा बोजा लादु नये.

५. अर्जदाराने स्व:खर्चाने उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाचे दोन रंगीत छायाचित्र फोटो काढुन तपास अधिका-यांचे सुपुर्द करावे.

६. तपास अधिका-यांनी उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाचे सुपुर्तनाम्यावर सोडण्यापुर्वी त्याबाबतचा विस्तृत पंचनामा तयार करावा.

७. तपास अधिका-यानी किंवा न्यायालयानी दिलेल्या आदेशाप्रमाणे अर्जदाराने उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाचे आवश्यकते नुसार हजर करावे.

८. उपरोक्त नमुद जप्त मुद्देमालाचा वापर कोणताही गुन्हा करण्याकरीता करू नये.

९. प्रस्तुत आदेशाची प्रत संबंधीत पोलीस स्टेशनला पाठवावी.

१०. तपासी अंमलदार यांनी सदर आदेशाची व बंधपत्राची प्रत दोषारोप पत्रा सोबत जोडावी.

स्वा/-

**( एम. के. कुरे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बार्शिटाकळी

ठिकाण:-बार्शिटाकळी
दिनांक :-२४/०३/२०२६

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | S. E. Nath |
| Name of the Court | CJJD & JMFC, Barshitakli, |
| Date of Order & Judgment | 24.03.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 24.03.2026 |
| Order/Judgment uploaded on | 24.03.2026 |